# स्त्रियांसाठी कर्करोग तपासणी शिबिर

## फिनोलेक्स, मुकुल माधव : 'परकार'मध्ये १५ पर्यंत आयोजन



रत्नागिरी, ता. ८ : आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून फिनोलेक्स कंपनी, मुकुल माधव फाउंडेशन आणि परकार हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटरतर्फे स्त्रियांच्या स्तनाचा कर्करोग निदान शिबिराला आज प्रारंभ झाला. हे शिबिर १५ मार्चपर्यंत सुरू राहणार आहे. परकार हॉस्पिटलमध्ये सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत शिबिर सुरू राहील.

शिबिराची सुरवात आज सकाळी परकार हॉस्पिटल येथे करण्यात आली. पहिल्याच दिवशी महिलांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. मागील वर्षी मुकुल माधव फाउंडेशन आणि फिनोलेक्स कंपनीतर्फे महिलांसाठी रत्नागिरी येथे कर्करोगाची चिकित्सा करण्यासाठी परकार हॉस्पिटलमध्ये मॅमोग्राफी आणि कोलोस्कॉपी यंत्रे देणगी स्वरूपात दिली आहेत.

शिबिराच्या कालावधीमध्ये ३५ वर्षांवरील महिलांची चाचणी होणार आहे. सुरवातीच्या काळात रत्नागिरीच्या महिलांना मुंबई किंवा कोल्हापूर येथे अशा चाचणीकरिता जावे लागत होते. ही सुविधा रत्नागिरीत उपलब्ध नसल्याने बऱ्याच महिला अशा चाचण्या करण्यास टाळाटाळ करीत होत्या. आता ही सुविधा रत्नागिरीत उपलब्ध झाल्याने आजच्या पहिल्याच शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला.

शिबिरादरम्यान दररोज पुण्यातील प्रशांती कॅन्सर केअर मिशनतर्फे कॅन्सरतज्ज्ञ डॉ. सी. बी. कोप्पीकर परकार हॉस्पिटलमध्ये उपस्थित रहाणार आहेत. चिकित्सांचे अहवाल व मूल्यांकन प्रशांती कॅन्सर केअर टीमतर्फे ऑनलाइन होणार आहेत.